
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Special Issue : April 2018





# VIBGYOR

Bi-annual Multidisciplinary Research Journal

**SPECIAL ISSUE - APRIL 2018**


*The VIBGYOR, a plethora of gem studded writings by eminent scholars from across the globe would genuinely usher a new vigour among the intellectuals in the world. The National and International luminaries in the Editorial Board would synchronize the views penned by renowned scholars from far and wide for publication. The biannual Multi-disciplinary Research Journal extends its canvas to all qualitative writings.*


Editor In Chief

**DR. JOBI GEORGE**

Principal

Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Editor

**DR. SUNIL SHINDE**

Associate. Prof. & Head

Dept. of Economics

Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur



Published By

**Research Journal Publication Committee**

Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur

Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

Dist. Nagpur - 441201(M.S.) India

Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240

E-mail : vibgyorbmv@yahoo.in

Website : www.bgm.ac.in

**VIBGYOR**

Bi-annual Multidisciplinary Research Journal
Special Issue - April 2018

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

**UGC Approved List of Journals**
**Journal No. 46447**

**ISSN-2277-4491**

**Special Issue : April 2018**

**© Author**
Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.

**Type Setting**
**Scan Dot Computer,**
Mahal, Nagpur Mobile : 9822565782
E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | THE STATUS OF ENGLISH AS A LINK LANGUAGE IN INDIA TODAY: A REVIEW | **Dr. Jobi George** | 7 |
| 2. | Identity and Multiculturalism in Zadie Smith's, 'White Teeth' | **Dr. Vinita S Virgandham** | 12 |
| 3. | Identity, Displacement, and Resilience: Amitav Ghoshs Portrayal of the Colonial Experience | **Dr. Raheel Quraishi** | 18 |
| 4. | A study on Patent awareness among faculties of Engineering Colleges | **Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** | 22 |
| 5. | An Overview of Indian Government Policies in the Agricultural Sector and Farmers' Suicides | **Dr. Mangesh Kadu** | 29 |
| 6. | Physical Fitness: The need of the Era | **Asst. Prof. Aditya Sarwe** | 35 |
| ७. | द्रारिद्र्य निमुर्लन आणि सरकारच्या कल्याणकारी योजना : एक दृष्टीक्षेप | **प्रा. डॉ. सुनिल शिंदे** | ३७ |
| ८. | महाराष्ट्रातील तमाशा : एक लोकनाट्य | **प्रा. डॉ. मधुकर वि. नंदनवार** | ४१ |
| ९. | मानवाधिकार और बुद्‌ध तत्वज्ञान | **प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण** | ४६ |
| १०. | नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास | **प्रा. डॉ. राजेश बहुरुपी** | ५० |
| ११. | आधुनिक काळात मूल्यशिक्षण व्यवसायाची खरी गरज | **प्रा. डॉ. अनिता महावादीवार** | ५३ |
| १२. | धम्मपालनाची मानवी दृष्टिकोनातून वर्तमान उपयोगिता | **सहा. प्रा. सोमेश्वर विनोदराव वासेकर, सहा. प्रा. भिमादेवी महादेव डांगे** | ५७ |

# द्रारिद्र्य निमुर्लन आणि सरकारच्या कल्याणकारी योजना : एक दृष्टीक्षेप

❑ प्रा. डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभागप्रमुख
भिवापूर महाविद्यालय
भिवापूर, जि. नागपूर

**● प्रस्तावना**

दारिद्र्य आणि उपासमार ही केवळ भारतासमोरच नाही तर संपूर्ण जगासमोर असलेल्या प्रमुख समस्यामध्ये महत्वाची समस्या आहे. दारिद्र्य समस्याच नाही तर शापसुध्दा आहे. भारताच्या ७० टक्के लोकसंख्येला पोटभर अन्न मिळत नाही. ही भारतासारख्या आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या देशाची शोकांतीका आहे. भारतात आर्थिक विकास दर जीतका वाढत आहे. तितके दारीद्र्य वाढत आहे. एकूण दारिद्र्याच्या टक्केवारीत घट होतांना दिसते तरीसुध्दा वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या लोकांच्या संख्येत भर पडत आहे. प्रधानमत्र्यांचे आर्थिक सलाहगार परिषदेचे अध्यक्ष सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेषज्ञ समितीने तयार केलेल्या अहवालानुसार भारतामध्ये ३७.५ टक्के लोक दारीद्र्यामध्ये जीवन जगत आहेत.

उत्पन्न वितरणातील विषमता आणि वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या अनेक महत्वाच्या समस्येमध्ये दारिद्र्य ही एक समस्या होय. भारतामध्ये १ एप्रिल १९५१ पासून आर्थिक विकास व विकासाच्या माध्यमातून दारिद्र्य निमुर्लनासाठी ११ पंचवार्षिक योजना, तीन साखळी योजना पूर्ण झालेल्या आहेत. अनेक पंचवार्षिक योजनाच दारिद्र्य निमुर्लनाला प्राधान्य देऊन तयार करण्यात आलेल्या आहेत. ह्या पंचवार्षिक योजनामध्ये दारिद्र्य निमुर्लनासाठी अनेक महत्वाकांषी योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे उत्तरोत्तर भारतातील दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमीकमी होत आहे. परंतु दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्याचे प्रमाण पाहिजे तेवढे कमी झाले नाही. काही दिवसाअगोदर भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी २१ टक्यांपर्यत भारताचे दारिद्र्य कमी झालेले असून भारतीय लोकांचे राहणिमान पूर्वीपेक्षा सुधारले आहे. हे सरकारच्या दीर्घकालीन नियोजनाचे आणि आर्थिक सुधारणांचे यश आहे असे म्हटले आहे.

**● दारिद्र्याचा अर्थ**

दारिद्र्य म्हणजे काय? आणि दारिद्र्याचे मोजमाप कोणत्या आधारावर केले जावे यासंदर्भात अर्थशास्त्रज्ञामध्ये आणि दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी नेमलेल्या विविध समित्यामध्ये एकवाक्यता आढळत नाही. त्यामुळे दारिद्र्याची निश्चित आणि काटेकोर व्याख्या करणे अवघड आहे. तसेच काळानुसार, परिस्थितीनुसार आणि व्यक्तिनुसार दारिद्र्याचा अर्थ आणि व्याख्या बदलली आहे.

जीवनाच्या मुलभूत किमान गरजा भागविता येण्याची अक्षमता म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्य ही एक अशी सामाजिक समस्या आहे, ज्यामध्ये समाजाचा एक मोठा गट जीवनाच्या मुलभूत गरजापासून वंचित राहतो. दारिद्र्याची संकल्पना एक सापेक्ष संकल्पना आहे. ज्यामध्ये चांगल्या जीवन स्तराऐवजी निम्न जीवन स्तराच्या आधारावर दारिद्र्याची कल्पना करण्यात येते.

**● दारिद्र्याची व्याख्या**

भारतात दारिद्र्याच्या व्याख्येचा आधार उच्च जीवन स्तराऐवजी निम्न जीचन स्तरच मानन्यात येतो. भारतात गरिबीचे प्रमाण मोजन्यासाठी दारिद्र्य रेषा या संकल्पनेचा वापर केला जातो. १९७३-७४ पासून नियोजन आयोग दारिद्र्य रेषा ठरविण्यासाठी पुढील दोन निकषांचा वापर करीत आहे.

१) **दरडोई प्रतिदिन उष्मांक उपभोग :** या निकषानुसार ग्रामीण भागात किमान उष्मांक उपभोग २४०० कॅलरी, तर शहरी भागात किमान २१०० कॅलरी एवढा ठरविण्यात आला आहे.

२) **दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च :** या निकषानुसार दारिद्र्य रेषा २००४-०५ मध्ये (आधारभूत वर्ष : १९७३-७४) ग्रामीण भागात दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च रु. ३५६.३० तर शहरी भागात रु. ५३८.६० एवढी ठरविण्यात आली आहे. यावरून जी कुटुंबे दारिद्र्य रेषेपेक्षा कमी खर्च करतात. त्यांना 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे' तर जी कुटूंबे दारिद्र्य रेषेपेक्षा जास्त खर्च करतात. त्यांना 'दारिद्र्य रेषेवरील कुटूंबे' असे संबोधले जाते.

**● दारिद्र्याचे मोजमाप करणाऱ्या विविध समित्या**

दारिद्र्य रेषेचे निकष ठरविणाऱ्या सरकारच्या अगोरदच्या

मोजमाप करण्याच्या पध्दतीवर टिका झाल्याने सरकारने विविध समित्यांची स्थापना केली.

१) **एन.सी. सक्सेना समिती :** केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने एन.सी. सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन केली. या समितीने सप्टेंबर २००९ मध्ये अहवाल सादर केला. ह्याा समितीने आवश्यक कॅलरीज मिळावी याकरीता सध्याच्या दारिद्र्य रेषेमध्ये वाढ सुचविली. त्यामुळे या समितीच्या निकषावरून दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या ५० टक्के इतकी उच्च आहे. परंतु नियोजन आयोगाने या शिफारशी फेटाळून लावल्या. केंद्रीय नियोजन मंडळाने नोव्हेंबर २००९ मध्ये या समितीची स्थापना केली. या समितीने ८ डिसेंबर २००९ ला अहवाल सादर केला.

२) **सुरेश तेंडूलकर समिती :** या समितीने दारिद्र्य रेषा मोजण्यासाठी कॅलरीजच्या निकषाचा वापर सोडून देण्याची शिफारस केली तसेच दारिद्र्याचे मोजमाप करतांना आरोग्य व शिक्षणावर होणारा खर्च विचारात घेतला. या समितीने २००४-०५ साठी ग्रामीण भागासाठी ४४६.६८ रु. तर शहरी भागासाठी ५७८.८ रु. अशी दारिद्र्य रेषा सुचविली. या समितीच्या निकषानुसार देशातील दारिद्र्याचे प्रमाण ३७.२ टक्के, ग्रामिण भागात ४१.८ टक्के, शहरी भागात २५.७ टक्के असल्याचे सांगितले. नियोजन मंडळाने या समितीच्या शिफारशी स्विकारून शहरी भागासाठी २८.६५ रु. तर ग्रामीण भागासाठी २२.४२ रु. प्रतिदिन उपभोग खर्चाची रेषा निश्चित केली.

**● भारतातील दारिद्र्याची कारणे**

दारिद्र्य ही समस्या नसून शाप आहे. अनेक वर्षापासून काही कुटूंबे पिढ्यानपिढ्या दारिद्र्यामध्ये खिचपत पडलेले आहेत. त्यांच्याकडे दोन वेळचे अन्न, शरीराला झाकेल एवढे वस्त्र आणि उन, थंडी आणि पाण्यापासून बचाव करण्यासाठी साध्या निवाऱ्याची सोय उपलब्ध नाही. भारतातील दारिद्र्याची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **वाढती लोकसंख्या :** वाढती लोकसंख्या दारिद्र्याचे महत्वाचे कारण आहे. अन्नधान्याचा पुरवठा कमी आणि खानेवाल्यांची संख्या बरीच जास्त आहे. बालश्रमिकांमुळे दारिद्र्यामध्ये वाढ होत आहे. त्यांच्याकडून कमी मजुरीवर काम घेतले जाते.

२) **वाढती महागाई :** वाढती महागाई दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेल आणि अन्नधान्यांचे भाव वाढत असल्यामुळे मजुरी करणाऱ्या श्रमिकांचे शोषण होत आहे. महागाईच्या तुलनेत त्यांच्या मजुरीत फारच थोडी वाढ होत आहे.

३) **वाढता भ्रष्ट्राचार :** भारतातील वाढता भ्रष्ट्राचारामुळे श्रीमंत लोकांच्या गरजा पूर्ण होत आहे. त्यांच्यामुळेच वस्तुंना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परिणामतः वस्तुच्या किंमती वाढून वस्तु खरेदी करणे गरीब लोकांच्या आवाक्याच्या बाहेर गेले आहे. देशामध्ये दररोज नवेनवे भ्रष्ट्राचाराचे प्रकरण समोर येत आहे. नेत्यांनी आणि नौकरशाहीने अक्षरक्षः देशाला लुटून टाकले आहे.

४) **अशिक्षितपणा :** दारिद्र्य आणि उपासमारीला अशिक्षितपणा जबाबदार आहे. अज्ञानी व्यक्ती परिवाराचे नियोजन करीत नाही. त्यामुळे परिवारामध्ये मुलांची संख्या अधिक होते. त्यामुळे मुलांच्या पालनपोषणाची समस्या निर्माण होते.

**● दारिद्र्य निमुर्लनासाठी सरकारच्या प्रमुख योजना**

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारत सरकारने दारिद्र्याचे समूह उच्चाटन करण्यासाठी आणि दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या लोकाचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केलेल्या आहेत. काही प्रमुख योजना पुढीलप्रमाणे आहेत.

१) **दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना :** ही भारत सरकारची तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्यासाठीची एक योजना आहे. याद्वारे विशेषतः, दारिद्र्यरेषेखाली व अनु. जाति व जमातीच्या युवकांना यात जुळवुन, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे, फायदा होणारा रोजगार पुरविण्याचा हेतू आहे. ही योजना २५ सप्टेंबर २०१५ ला नितीन गडकरी व व्यंकैय्या नायडू यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. या योजनेसाठी दीनदयाल उपाध्याय यांच्या ९८ व्या जयंतीचे निमित्त साधण्यात आले. या योजनेद्वारे १५ ते ३५ वयोगटातील ग्रामीण युवकांना लक्ष्य बनविण्यात आले आहे. १५०० कोटी रुपये या योजनेसाठी देण्यात आले आहेत. या योजनेमुळे ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या योजनेमध्ये विद्यार्थ्यांच्या खात्यांत पैसे थेट जमा करण्याची सोय आहे. या योजनेअंतर्गत खाजगी शिक्षण व प्रशिक्षण तज्ञांना प्रशिक्षण स्थापन करण्यास निधी दिला जाईल.

या योजनेअंतर्गत जम्मू काश्मीर व्यक्तीसाठी हिमायत व नक्षल प्रभावित व्यक्तीसाठी रोशनी नावाचा उपक्रम चालवला जातो.

२) **अटल पेन्शन योजना :** ही भारत सरकारचे पाठबळ

असलेली असंघटित क्षेत्रासाठीची एक योजना आहे. २०१५ च्या आर्थिक अंदाजपत्रकाच्या भाषणादरम्यान, अर्थमंत्री अरुण जेटली यांनी ह्या योजनेचा प्रथमतः उल्लेख केला होता. नंतर त्याचवर्षी ९ मे रोजी कोलकाता येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेचे औपचारिकरित्या उद्‌घाटन केले. या योजनेने २०१०-११ साली सुरू केलेल्या स्वावलंबन योजनेची जागा घेतली आहे. ही योजना १८ ते ४४ वयोगटातील व्यक्तींसाठीची योजना आहे. असंघटीत क्षेत्र नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन २०११-१२ मधील पाहणीनुसार ४७.१९ कोटी रोजगारीत लोकसंख्येपैकी असंघटीत क्षेत्रातील कामगारांचा वाटा सुमारे ८८ टक्के आहे. योजनेत या गटाला लक्ष्यगट ठरविले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्याला ६० वर्षे वयानंतर आधारित मासिक १००० ते ५००० रु. पेन्शन मिळणार आहे. तसेच वारसदाराला १.७ लाख रु. ते ८.५ लाख रु. एकरकमी लाभ मिळणार आहे.

३) **प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना :** ही एक भारत सरकारची कौशल्य विकास करण्यासाठीची योजना आहे. ही योजना १५ जुलै २०१५ रोजी सुरू झाली. याद्वारे कौशल्ये ओळखणे व त्यांना दर्जा देणे अशी कामे केल्या जातील. या योजनेद्वारे दैनिक वेतन मिळणाऱ्या कामगारांचे कौशल्याचा विकास करणे असा उद्देश आहे जेणेकरून त्यांना योग्य रोजगार मिळू शकेल.

४) **प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना :** ही भारतातील भारत सरकारचे पाठबळ असलेली एक जीवन विमा योजना आहे. याचा उल्लेख अर्थमंत्री अरुण जेटली यांनी आपल्या अंदाजपत्रकीय भाषणात फेब्रुवारी २०१५ मध्ये केला होता. याचे विमोचन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेद्वारे दि. ९ मे ला कोलकाता येथे झाले. मे २०१५ च्या आकडेवारीनुसार भारतात फक्त २० टक्के लोकांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारचा विमा आहे. परंतु ज्यांचा कोणत्याच प्रकारचा विमा नाही अशा १८ ते ५५ वर्ष वय असलेल्या लाभार्थ्यांना वयाच्या ५५ वर्षापर्यंत या योजनेच्या माध्यमातून जोखिम संरक्षण मिळते.

५) **इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना :** ही पेन्शन योजना ६५ वर्षावरील सर्व जेष्ठ नागरिकांना लागू असून केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे योगदान आहे. ३०/०९/२००८ च्या सरकारी आदेशानुसार लाभार्थी हा दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाचा सदस्य असावा. त्याच्याकडे वयाचा आणि १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा दाखला असावा. लाभार्थीने तीन महिने पेन्शन खात्यातून रक्कम काढली नाही तर रक्कम राज्यशासनाला परत होते.

६) **राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना :** या योजनेअंतर्गत दारिद्रयषेखाली असणाऱ्या कुटुंबातील कमविणाऱ्या मुख्य कर्ता व्यक्तीचा वय १८ ते ६४ दरम्यान मृत्यू झाल्यास राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अंतर्गत १०००० रु. लाभ दिला जातो. यामध्ये लाभ वाढविला सुध्दा जावू शकतो.

७) **इंदिरा आवास योजना :** ही योजना १९८५-८६ मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना, मुक्त वेठबिगारांना तसेच दारिद्रयरेषेखालील लोकांना मोफत घरे उपलब्ध करून देणे किंवा नवीन घरे बांधून देणे हा उद्देश योजनेचा आहे.

८) **प्रधानमंत्री ग्रामोदय योजना :** ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या लोकांसाठी ‘प्रधानमंत्री ग्रामोदय योजना’ तयार करण्यात आली. ग्रामीण भागाच्या विकासाकरीता या योनेतून अर्थसहाय्य केले जाते व त्यातून झोपडपट्टी विकास, निवारा, रस्ते, पुल आणि सेवा पुरवणाऱ्या छोट्या विकास कामांचा समावेश होतो.

९) **अंन्त्योदय अन्न योजना :** ही योजना २००१ साली सुरू झाली. या योजनेअंतर्गत दारिद्ररेषेखाली असणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य देण्यात येते. या योजनेचा लाभ १.५ करोड कुटुंबांना मिळत आहे. या अंतर्गत अनेक मागासलेल्या भागात तांदुळ फुकट वाटण्यात येत आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत ५ किलो तांदुळ आणि दैनिक मजुरी म्हणून ३२ रु. नगदी प्रत्येक दारिद्र्यरेषेखालील मजुरांना दिल्या जाते. रस्ते बांधणी, शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा, आरोग्य, पर्यावरण व्यवस्था सुधारण्यासाठी कामे केली जातात.

१०) **अन्नपूर्णा योजना :** राज्यात केंद्रीय अन्नपूर्णा योजनेची अंमलबजावणी १ एप्रिल २००१ पासून सुरू करण्यात आली. ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेअंतर्गत ६५ वर्ष किंवा त्यावरील निराधार स्त्री आणि पुरूष यांना दरमहा १० किलो धान्य मोफत देण्यात येते. या योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्थी पात्रता निकष विहीत करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ज्या व्यक्तींना केंद्र वा राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत पेन्शन योजनेचा लाभ मिळत नाही अशी व्यक्ती यासाठी पात्र आहे. केंद्र शासनाकडून या योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यासाठी १,२०००० इतका इष्टांक मंजूर करण्यात आला आहे.

११) **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना :** १ एप्रिल

१९९९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब लोकांसाठी स्व-रोजगार निर्माण करणारी ही एक व्यापक योजना आहे. या योजनेत पूर्वी चालू असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास योजना, स्वरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम, ग्रामक्षेत्र महिला आणि बालविकास कार्यक्रम, दशलक्ष विहीर योजना, गंगा कल्याण योजना या सर्व योजना बंद करून ह्याचे विलीनीकरण करण्यात आले. ग्रामीण भागातील समाजाला पूर्णतः स्वयंपूर्ण करणे, त्याचे इतरांवरील अवलंबित्व कमी करून स्वावलंबी करणे यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लघु उद्योगाची स्थापना करून गरीबांसाठी पर्याप्त उत्पन्नाची व्यवस्था करणे, आणि ग्रामीण कार्यक्रम तयार करतांना ग्रामीण भागातील प्रतिभा आणि क्षमता यांना वाव देवून युवकांना प्रोत्साहित करणे यावर भर दिला आहे. या योजनेचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण लोकांना या योजनेतून स्वरोजगार उपलब्ध करणे लाभार्थी नव्हे.

१२) **जवाहर ग्राम समृध्दी योजना :** देशाच्या ग्रामीण भागातील बेरोजगारीचा व दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी इ.स. १९८० मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि १९८३ मध्ये ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम सुरू केले होते. या कार्यक्रमाची अधिक परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने सरकारने १९८९ मध्ये नव्या जवाहर रोजगार योजनेत त्याचे विलिनीकरण घडवून आणले. जवाहर रोजगार योजनेचे महत्वाचे वैशिष्ट्य असे की, तिची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आली होती. आणि अंमलबजावणीच्या या कार्यावर ग्रामसभेचे नियंत्रण राहणार होते. म्हणजे या योजनेची सर्व सूत्रे प्रत्यक्ष जनतेच्या हाती देण्यात आली होती.

१९९९ मध्ये जवाहर रोजगार योजना बंद करून तिचे विलीनीकरण जवाहर ग्राम समुध्दी योजनेमध्ये करण्यात आले. ही योजना एप्रिल १९९९ पासुन कार्यान्वित झाली. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधाण्यासाठी ही योजना व्यापक स्वरुपात स्विकारण्यात आली. या योजनेमार्फत अनुसूचित जाती-जमातीच्या विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्यारेषेखालील कुटूंबांना रोजगारीच्या संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. या योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर टाकण्यात आली आहे. कार्यक्रमावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे नियंत्रण असते.

**● उपसंहार**

२०२० पर्यन्त भारत जागतीक स्तरावर चौथी मोठी आर्थिक महाशक्ती म्हणून उदयास येइल असे भाकित जागतिक बँकेने केले आहे. चीन नंतर आंतराष्ट्रीय स्तरावर वेगाने विकसीत होणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहीले जाते. भारतीय योजना आयोगाने "विजन २०२०" या नावाने मसुदा प्रसिध्द केला त्यामध्ये म्हटले की भारताच्या अंतर्गत उत्पादनाचा विकास दर ८.५ ते ९ टक्के आणि लोकसंख्या वृध्दी अनुपात १.८ प्रतिशत इतका मर्यादीत राहील्यास भारत उच्च-मध्यम उत्पन्न वर्गातील देशांच्या पंक्तीमध्ये येईल. ज्यामध्ये आज अर्जेंटीना, चिली, मलेशिया, मेक्सिको, द.आफ्रिका आणि चीनचा समावेश होतो. भारताचे प्रतीव्यक्ती उत्पन्न सध्याच्या तुलनेत चार पट आणि गरीबीचे प्रतिशत २६ टक्यांवरून १३ प्रतिशतच्या खाली येईल, प्रत्येक वर्षी १ करोड नवीन रोजगारीच्या संधी निर्माण होईल. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांच्या संख्येत कमालीची घट होईल अशी अपेक्षा केली जाते.

**● संदर्भसूची**


१. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन.एल. चव्हाण

२. भारतीय अर्थव्यवस्था - रूद्र दत्त के.पी. एम. सुंदरम

३. दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण - सी.प. खेर, दिलीपराज प्रकाधन प्रा.ली. पुणे

४. भारतीय अर्थव्यवस्था - श्री. रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन, पुणे

५. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल :-प्रा. शरद शंकर जोशी, डायमंड पब्लिकेशन, पुणे


☆☆☆